


# पारनेर दर्शन




वर्ष १ अंक २०४, गुरुवार २५ एप्रिल २०२४ ■ संपादक : देविदास आबूज ■ कार्यकारी संपादक : विजय वाघमारे RNI No.MAHMAR/2015/61493 किंमत : ३ रुपये

# समाजासाठी काम करणाराला संपत्तीचा मोह नसतो - नीलेश लंके

नगर : प्रतिनिधी

**समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला कधीही संपत्तीचा मोह नसतो. संपत्तीसाठी मी कधीही विचार केला नाही. समाजसाठी काम करणे हेच माझे उद्दीष्ट असल्याचे सांगत आ. नीलेश लंके यांनी गेल्या साडेचार वर्षात त्यांच्या कमी झालेल्या संपत्तीबददल तसेच वाढलेल्या कर्जाबाबत पत्रकारांशी बोलताना स्पष्टीकरण दिले.**

आ. लंके यांनी आपला उमेदवार अर्ज दाखल केल्यानंतर निवडणूक आयोगाकडून जाहिर करण्यात आलेल्या त्यांच्या संपत्तीच्या विवरणात त्यांची संपत्ती कमी होऊन त्यांचे कर्जही वाढले असल्याची बाब पुढे आली. त्याबाबत पत्रकारांनी लंके यांच्याशी संवाद साधला असता त्यांनी त्यांची भूमिका स्पष्ट केली.

एकीकडे तुमची संपत्ती कमी होत असताना विरोधी उमेदवार डॉ. सुजय विखे यांच्या संपत्तीमध्ये मोठया प्रमाणावर वाढ झाल्याचे दिसून येते असा प्रश्न उपस्थित केल्यानंतर लंके म्हणाले, मी पहिल्या दिवसापासून सांगत आलो आहे की मी जे आजवर काही केले ते समाजसाठी केले आहे. स्वत:साठी काहीच केले नाही. माझ्यावर आरोप झाले मात्र मी निवडणूकीचा अर्ज दाखल केल्यानंतर खरे सत्य बाहेर आले. समाजासाठी काम करणाऱ्या व्यक्तीला संपत्तीचा कधीही मोह नसतो. संपत्तीसाठी मी कधीही विचार केला नाही. समाजसाठी काम करणे हेच माझे उद्दीष्ट आहे. जनतेच्या सेवकाने प्रामणिकपणे काम केले पाहिजे या भावनेतून मी काम करतो.

गेल्या पन्नास वर्षांपासून आम्ही राजकारणात आहोत. आमच्या संस्था आहेत, सहकारामध्ये आम्ही काम करतो त्यामुळे माझी श्रीमंती हा निवडणूकीचा विषय होऊ शकत नाही असे डॉ. सुजय विखे सांगतात



या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, त्यांची श्रीमंती सर्वांनाच माहीती आहे. मात्र ही निवडणूक धनशक्ती विरूध्द जनशक्ती अशी झालेली आहे. सत्तेचा गैरवापर करणे, कार्यकर्त्यांवर दबाव आणणे असे प्रकार विखे यांच्याकडून सुरू असल्याचा आरोप लंके यांनी केला.

गेल्या साडेचार वर्षात तुमच्या संपत्तीमध्ये घट झाली असून कर्जही वाढले असल्याबद्दल विचारले असता लंके म्हणाले, समाजासाठी काम करत असताना कर्ज वाढणारच आहे. इतरांप्रमाणे आमचे इन्कमींग सुरू नाही.

तुम्ही एक सामान्य उमेदवार असताना मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री नगरमध्ये येऊन तुमच्यावर टीका करतात त्याकडे कसे पाहता असे विचारले असता लंके म्हणाले, ते त्यांच्या राजकीय व्यासपीठावर येतात. त्यामुळे त्यांना टीका करणे क्रमप्राप्त असते असे लंके यांनी स्पष्ट केले.

तुमच्यावर दोन गुन्हे दाखल आहेत याची आठवण करून दिली असता लंके यांनी कशाचे गुन्हे आहेत हे तपासले का असा प्रतिप्रश्न केला. कांदा भावासाठी मी सरकारमध्ये सहभागी असतानाही आंदोलन केले होते. त्यामुळे माझ्यावर गुन्हा दाखल झाला आहे. मी विचार केला नाही मी सत्तेत आहे की नाही. सगळयात महत्वाचा प्रश्न माझा शेतकरी जगला पाहिजे असे लंके म्हणाले.

## ढोंगी प्रेम कशासाठी?

**डॉ. सुजय विखे यांनी अर्ज दाखल केल्यानंतर झालेल्या सभेनंतर गोपीनाथ मुंडे यांचे फोटो फिरविण्यात आले या प्रश्नावर बोलताना लंके म्हणाले, असे ढोंगी प्रेम कशाला दाखवता ? कार्यक्रम संपल्यावर मुंडे साहेबांचा फोटो लावणे हा ढोंगीपणा आहे. याआगोदर कधी मुंडे साहेबांचे नाव घेतले का ? बॅनरवर फोटो लावला का ? तुमचे मुंडे साहेबांवर प्रेम होते तर मग पाच वर्षात तुमच्या बॅनरवर मुंडे साहेबांचा फोटो हवा होता ना ? बाळासाहेब ठाकरे, गोपीनाथ मुंडे, आर.आर. पाटील, विलासराव देशमुख हे नेते होउन गेले. त्यांच्याविषयी मला नेहमीच आकर्षण राहिले आहे असल्याचे लंके यांनी सांगितले.**

## दादागिरी, गुंडगिरीविरोधात निवडणूक

**सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडविण्यासाठी मी ही निवडणूक लढवत आहे. आज विरोकांकडून दादागिरीचे वातावरण निर्माण केले जात आहे. या दादागिरी, गुंडगिरीविरोधात आपण निवडणूक लढवित आहोत. मतदारसंघात पाणी, बेरोजगारी आदी प्रश्न आहेत. हे प्रश्न सोडविण्यासाठी आपण प्रयत्न करणार असल्याचे लंके म्हणाले.**

# ...म्हणून डॉ.सुजय विखेंचा विजय निश्चित

## मंत्री विखे पाटलांचा कार्यकर्त्यांशी संवाद



सुपा : प्रतिनिधी

**ग्रामपंचायत, सोसायटीच्या निवडणूका असल्या की त्यात लक्ष घालायचे लोकांमध्ये दहशत निर्माण करायची दमबाजी करायची हे असले उद्योग तालुक्यात गेले साडेचार वर्षे सुरू होते. येणाऱ्या निवडणुकीत याचे उत्तर तुम्हाला मतपेटीतून द्यायचे असून या त्रासाला जनता कंटाळली म्हणून डॉ. सुजय विखे यांचा विजय निश्चित आहे असा टोला महसूलमंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री ना. राधाकृष्ण विखे पाटील यांनी माजी आमदार नीलेश लंके यांचे नाव न घेता लगावला.**

नामदार विखे पाटील यांनी बुधवारी सुपा जिल्हा परिषद गटात सुपा येथील तालुका दूध संघाचे अध्यक्ष दत्तानाना पवार यांच्या निवासस्थानीकार्यकर्त्यांशी संवाद साधला यावेळी ते बोलत होते.

पुढे बोलताना ना. विखे म्हणाले की, महायुतीच्या सरकारने अनेक चांगले निर्णय घेतले त्यात दूध उत्पादक शेतकऱ्यांना प्रतिलिटर पाच रुपये अनुदानाचा मोठ्या प्रमाणात लाभ झाला असून आज पर्यंत शेतकऱ्यांच्या खात्यावर सुमारे ७० कोटी रुपये जमा झाले आहे. काही दूध उत्पादक शेतकरी तालुक्याच्या व जिल्ह्याच्या बाहेर दूध घालतात अशा शेतकऱ्यांना अनुदानापासून वंचित रहावे लागले त्याचे मुख्य कारण म्हणजे कागदपत्रे सादर करण्यात अडचणी येऊ लागल्या. परंतु त्याही आपण दूर केल्या आहेत. भविष्यात एकही शेतकरी अनुदानापासून वंचित राहणार नाही अशी ग्वाही ना. विखे यांनी उपस्थितांना दिली. याचा निर्णय मी स्वत: घेणार असून मला कोणाला विचारायची गरज नाही. यामुळे जिल्ह्यातील दूध भेसळ कमी झाल्याचे आवर्जून सांगत भविष्यात भेसळ बंद करून निर्मळ वातावरण निर्माण करायचे असे सांगितले.

तालुक्यात हुल्लडबाजांची काही कमी नाही, त्यामुळे सुपा औद्योगिक वसाहतीमधील अनेक उद्योग बाहेर गेले याला सर्वस्वी जबाबदार कोण असा प्रश्न उपस्थित करत भविष्यात उद्योजकांच्या पाठीशी भक्कमपणे उभे रहाणारा खासदार आपणास निवडून द्यायचा आहे असेही ते म्हणाले.

यावेळी विश्वनाथ कोरडे, काशिनाथ दाते,राहुल पाटील शिंदे, विक्रमसिंह कळमकर, सागर मैड, रामचंद्र मांडगे, गणेश शेळके, सरपंच मनिषा रोकडे, योगेश रोकडे, दत्तात्रय पवार, सुनील पवार, सुरेश नेटके, अविनाश पवार, सुखदेव पवार, प्रतापसिंह शिंदे, राहुल पवार यांच्या सह कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## पारनेर तालुका आघाडी घेईल

**तालुक्यात अनेकांना कशा ना कशा प्रकारे त्रास दिला आहे. त्याचा वचपा काढण्याची हीच वेळ आहे. तालुक्यात डॉ. सुजय विखे पाटील यांनी नेहमीच झूकते माप दिले असल्याने पारनेर तालुका जिल्ह्यात आघाडी घेईल.**

**राहुल पाटील शिंदे**

# नितीन गडकरींना भाषणादरम्यान भोवळ

## यवतमाळच्या पुसद येथील प्रचारसभेतील घटना

यवतमाळ : प्रतिनिधी

**पुसद येथे महायुतीच्या सभेत भाषण देत असताना, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी हे भोवळ येवून पडले. या घटनेने सभास्थळी एकच खळबळ उडाली. ही घटना आज बुधवारी दुपारी घडली. प्रचंड उन्हामुळे गडकरी यांना भोवळ आल्याचे सांगितले जात असून त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे आयोजकांनी सांगितले.**

यवतमाळ-वाशिम लोकसभा मतदारसंघातील उमेदवार राजश्री हेमंत पाटील यांच्या प्रचारार्थ पुसद येथील शिवाजी विद्यालयाच्या प्रांगणात दुपारी २ वाजता नितीन गडकरी यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. या सभेत सर्वांची भाषणे झाल्यानंतर नितीन गडकरी यांनी बोलण्यासाठी उभे राहिले. त्यांनी सुधाकरराव नाईक यांच्या आठवणी सांगत शेतकऱ्यांना शेती फायद्यात कशी आणायची याचे सल्ले दिले.




जवळपास १५ मिनिटे ते बोलत होते. भाषणाच्या अखेरीस त्यांना अस्वस्थ वाटू लागल्याने त्यांनी मंचावरील व्यक्तीस कुलर आपल्याकडे करण्यास सांगितले. त्यावेळी पुढे बोलताना त्यांचा स्वर कापरा झाला. तरीही त्यांनी राजश्री पाटील यांना निवडून द्या, असे आवाहन केले आणि हे आवाहन करत असतानाच त्यांचा तोल गेला. त्यांना पोडियमला धरून सावरण्याचा प्रयत्न केला. सुरक्षा रक्षक व मंचावरील इतरांनी धावत जावून त्यांना उलचून खुर्चीत बसविले. त्यानंतर गडकरी यांना तातडीने ग्रीन रूममध्ये नेण्यात येवून डॉक्टरांना पाचारण करण्यात आले. आता त्यांची प्रकृती स्थिर असल्याचे आयोजकांनी सांगितले.

विदर्भात उन्हाचा प्रचंड तडाखा आहे. पुसदमध्ये तुलनेने अधिक ऊन आहे. गडकरी यांची सभा भर उन्हात ठेवण्यात आली होती. त्यातही सभा विलंबाने सुरू झाली. कापडी मंडप असल्याने उकाडा खूप होता. नितीन गडकरी यांचे भाषण रंगात आले असतानाच त्यांनी कुलर आपल्याकडे वळविण्याची सूचना केली तेव्हाच त्यांना अस्वस्थ वाटत असल्याचे उपस्थितांच्या लक्षात आले. तेथून दोन मिनिटांत ते बोलताना कोसळल्याने तारांबळ उडाली. या प्रकाराने सभास्थळी एकच खळबळ उडाली असून अनेकांनी गडकरींच्या प्रकृतीची विचारपूस करण्यासाठी सभास्थळी धाव घेतली.






# ध्येय, धोरण आणि संकल्पांची सांगड म्हणजे पंतप्रधान मोदी

## ■ डॉ. सुजय विखे पाटील यांचे प्रतिपादन ■ सोनगाव चौकात कॉर्नर सभा



राहुरी : प्रतिनिधी

**देशात सध्या मोदीजींची हमी सुरू असून देशातील जनतेचा त्यावर विश्वास आहे. ध्येय, धोरण आणि संकल्पांची सांगड म्हणजे पंतप्रधान नरेंद्र असे प्रतिपादन डॉ. सुजय विखे पाटील यांनी केले. ते राहूरी तालूक्यातील सोनगाव चौकातील कॉर्नर सभेमध्ये बोलत डॉ. सुजय विखे पाटील यांनी विरोधकांचा सडकून समाचार घेत विरोधकांकडे नेता म्हणून कोणताही चेहरा नाही. त्यांच्याकडे 'एक ना धड बारा भानगडी आहेत'. ते फक्त देशाला फक्त खड्ड्यातच घालू शकतात. यामुळे पंतप्रधान नरेंद्र हे देशाला एकमेव पर्याय आहेत असे डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले.**

डॉ. सुजय विखे यांनी सांगितले की, सदरची निवडणूक ही देशाची प्रतिनिधित्व ठरवणारी निवडणूक आहे. येणाऱ्या काळात देश कुणाच्या हाती द्यायचा आहे हे जनतेला ठरवायचे आहे. देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या इतके प्रभावी नेतृत्व नाही आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली देशाने मागील १० वर्षात जी प्रगती केली हे जगासमोर मोठे उदारण आहे. देशात संविधान मजबूत करण्याचे काम पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले आहे. लोकशाही अधिक सुदृढ आणि लोखाभिमुख करण्यासाठी देशाला पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची देशाला गरज आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे देशाला विकासाच्या माध्यमातून जगात महासत्ता म्हणून पुढे आणायचे आहे. २०४७ च्या विकसित भारताची पायाभरणी करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे हात बळकट करा आणि महायुतीच्या उमेदवाराला मोठ्या मताधिक्याने निवडून द्या असे त्यांनी आवाहन केले.

Shree Datta Bahuuddeshiya Sanstha's

**Saint Vivekanand Public School**

A/P-Jamgaon, Tal-Parner, Dist-Ahmednagar

PH-9860815843, 9420812001

**REQUIRED TEACHERS 2024-2025**

We are looking for passionate experienced /fresher, innovative and qualified teacher with good communication skill and fluency in English for following classes.

| Sr.No. | Subject | Qualification | No.of Post |
|---|---|---|---|
| 1 | Pre-Primary | H.S.C./Graduate/D.Ted | 4 |
| 2 | Primary | H.S.C/Graduate/D.Ted /B.Ed | 3 |
| 3 | Math's | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 4 | Science | B.sc/M.sc/B.ed | 2 |
| 5 | STT | B.A./M.A.B.ed/(His/Geo) | 1 |
| 6 | English | B.A./M.A.B.Ed | 3 |
| 7 | Marathi | B.A/M.A.B.Ed | 2 |
| 8 | Hindi | B.A/M.A.B.Ed | 1 |
| 9 | Art Teacher (Drawing) | Diploma ATD | 1 |
| 10 | Administrative Staff | Compuer knowledge | 1 |

Walk-in Interview with all document on Thursday 25 April 2024 10.00 AM to 3.PM at Above Address

Note -

- Salary commensurate based on skill, qualification and Experience.
- Training will be provided to Fresher candidate who are Passionate about Education




# चंदेरी

# पूजानं घेतलं आलिशान घर!




**प्रत्येक कलाकाराचं स्वप्न असतं की मुंबईत स्वतःचं घर असावं. बाल्कनीतून समुद्र किनारा दिसावा. त्यामुळे बरेच कलाकार समुद्र किनारी घर घेताना दिसत आहेत. हाच ट्रेंड फॉलो करत अभिनेत्री पूजा हेगडेनं देखील समुद्र किनारी आलिशान घर घेतल्याचं समोर आलं आहे. पूजाचं हे आलिशान घर कुठे आहे? किती किंमत आहे? जाणून घ्या...**

दाक्षिणात्य सिनेसृष्टीत ठसा उमटवल्यानंतर अभिनेत्री पूजा हेडगेनं हृतिक रोशनसह 'मोहनजोदडो' चित्रपटाच्या माध्यमातून हिंदी सिनेसृष्टीत पदार्पण केलं. खूप कमी वेळात पूजाने बॉलीवूडमध्ये आपलं स्थान निर्माण केलं. अशा या लोकप्रिय अभिनेत्रीनं मुंबईत स्वतःचं हक्काचं घर घेतलं आहे. पूजाने मुंबईतील वांद्रे येथे आलिशान घर घेतलं आहे. पूजाच्या आलिशान घरातून समुद्र दिसतो. तिचं नवं घर ४ हजार स्क्वेअर फूटचं असल्याचं म्हटलं जात आहे. पूजाच्या या आलिशान घराची किंमत तब्बल ४५ कोटी रुपये आहे. लवकरच पूजा या नव्या घरात शिफ्ट होणार आहे. दरम्यान, पूजाच्या कामाबद्दल बोलायचं झालं तर, सलमान खानच्या 'किसी का भाई किसी की जान' या चित्रपटानंतर ती सुपरस्टार शाहिद कपूरसह झळकणार आहे. क्राइम थ्रिलर 'देवा' चित्रपटात पूजा व शाहिद ही नवी जोडी पाहायला मिळणार आहे.

# 'पुष्पा २' आणि 'सिंघम अगेन'ची लढाई टळली

रोहित शेट्टी दिग्दर्शित 'सिंघम अगेन' अर्थात सिंघमच्या तिसऱ्या भागाची सध्या सर्वांनाच उत्सुकता लागली आहे. येत्या १५ ऑगस्टला हा चित्रपट प्रदर्शित होणार होता. परंतु, अद्याप या चित्रपटाचं शूटिंग पूर्ण न झाल्याने प्रदर्शनाची तारीख पुढे ढकलण्यात आली आहे. आता चित्रपटाची नवीन रिलीज डेट लवकरच जाहीर करण्यात येईल. समोर आलेल्या माहितीनुसार आता २०२४ च्या दिवाळीत हा चित्रपट प्रेक्षकांच्या भेटीला येण्याची शक्यता आहे.

रोहित शेट्टी आणि अजय देवगण सध्या सिंघम चित्रपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत. १५ ऑगस्ट २०२४ रोजी हा चित्रपट रिलीज होणार असं याआधी रोहित शेट्टीने जाहीर केलं होतं. परंतु, सध्या चित्रपटाच्या शूटिंगला अपेक्षेपेक्षा जास्त वेळ लागणार असल्याची माहिती समोर आली आहे. रोहित आणि अजयला ठरलेल्या तारखेलाच चित्रपट प्रदर्शित व्हावा यासाठी




कोणतीही घाई करायची नाही. कोणतीही तडजोड न करता शूटिंग व्यवस्थित व्हावं अशी त्यांची इच्छा आहे. सध्या या चित्रपटाची टीम दिवाळी २०२४ मध्ये 'सिंघम अगेन' रिलीज करण्याचा विचार



करत आहे. यामध्ये रणवीर सिंह, अक्षय कुमार, टायगर श्रॉफ, दीपिका पदुकोण, करीना कपूर खान हे सेलिब्रिटी महत्त्वाच्या भूमिकेत झळकणार आहेत. याशिवाय अर्जून कपूर चित्रपटात खलनायकाची भूमिका साकारणार आहे. तारखेत बदल केल्यामुळे रोहित शेट्टीचा 'सिंघम' आणि अल्लू अर्जुनच्या 'पुष्पा २'चा बॉक्स ऑफिस क्लॅश टळणार आहे. 'पुष्पा २' आणि 'सिंघम अगेन' या दोन्ही चित्रपटांनी रिलीज डेट १५ ऑगस्ट जाहीर केल्याने बॉक्स ऑफिसवर नेमकं कोण बाजी मारणार याबद्दल प्रेक्षकांच्या मनात उत्सुकता निर्माण झाली होती. परंतु, निर्मात्यांनी 'सिंघम अगेन'च्या प्रदर्शनाच्या तारखेत बदल करण्याचा निर्णय घेतल्याने आता दिवाळीत प्रदर्शित होणाऱ्या 'भूल भुलैया ३' आणि 'सिंघम अगेन' चित्रपटाची बॉक्स ऑफिस स्पर्धा आपल्याला पाहायला मिळेल.

# एकेकाळी ऑफिस बॉयची नोकरी केली, आज बॉलीवूडचा सम्राट

**बॉलीवूड अभिनेता अक्षय कुमार सध्या त्याच्या 'बड़े मियां छोटे मियां' या चित्रपटामुळे चर्चेत आहे. नुकताच प्रदर्शित झालेला अक्षयचा हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर जबरदस्त कमाई करताना दिसत आहे. 'बड़े मियां छोटे मियां' या चित्रपटाला प्रेक्षकांचा उदंड प्रतिसाद मिळत आहे. या चित्रपटात अक्षयसह अभिनेता टायगर श्रॉफ झळकला आहे. अशातच एका मुलाखतीमधून अक्षयने पहिली नोकरी व पहिल्या पगारविषयी खुलासा केला आहे.**



'बड़े मियां छोटे मियां' चित्रपटाच्या निमित्ताने अक्षय व टायगरने 'कर्ली टेल्स' या युट्यूब चॅनेलला मुलाखत दिली. यावेळी अक्षयला त्याच्या पहिल्या पगाराविषयी विचारण्यात आलं. तेव्हा अक्षय म्हणाला की, मी १५- १६ वर्षांचा होता, तेव्हा मी कोलकातामधील ट्रॅव्हल एजन्सीमध्ये पहिली नोकरी केली होती. तिथे ऑफिस बॉयचं काम करायचो. या नोकरीचे मला १५० ते २०० रुपये मिळायचे. त्यानंतर अभिनेत्याला विचारलं, कमवायची एवढी घाई का होती? यावर अक्षय म्हणाला, जेव्हा माणूस शिकलेला नसतो, तेव्हा तो कोणतीही नोकरी करणारच ना. ही एकमेव नोकरी होती, जी मला लगेच मिळाली होती. त्यानंतर मी ढाकाला गेलो. तिथल्या एका हॉटेलमध्ये काम केलं. मग मी बँकॉकला गेलो. अक्षय म्हणाला, की काही दिवसांनंतर बँकॉकहून दिल्लीला आलो. तिथे काम केलं. तेव्हा मी खोटे दागिने विकायचो. दिल्लीतून घेऊन मुंबईत विकायचो. दिल्लीतून २० हजारांचे दागिने खरेदी केले तर मुंबईत येऊन २४ हजारांना विकायचो. दरम्यान, अक्षयला पहिल्या चित्रपटाचं पाच हजार मानधन मिळालं होतं. त्यानंतर अक्षयला दुसऱ्या चित्रपटासाठी ५० हजार आणि तिसऱ्या चित्रपटासाठी १.५० लाख मानधन मिळालं होतं.

# २० वर्षांनी एकत्र दिसले इमरान हाश्मी अन् मल्लिका शेरावत

बॉलीवूडची बोल्ड अभिनेत्री मल्लिका शेरावत आणि इमरान हाश्मी यांच्यातील भांडण अखेर २० वर्षांनी मिटलं आहे. दोघांचा एक व्हिडीओ समोर आला आहे, ज्यात ते गळाभेट घेऊन एकमेकांबरोबर पोज देताना दिसत आहेत. हा व्हिडीओ चित्रपट निर्माते आनंद पंडित यांच्या मुलीच्या रिसेप्शन सोहळ्यातला आहे. इमरान व मल्लिकाचं भांडण नेमकं का झालं होतं, ते जाणून घेऊयात...

२००४ साली आलेल्या इरॉटिक थ्रिलर चित्रपट 'मर्डर' मध्ये इमरान व मल्लिका यांनी एकत्र काम केलं होतं. या चित्रपटाच्या शूटींगदरम्यान इमरान व मल्लिका शेरावत यांच्यात भांडण झालं होतं. तेव्हापासून ते दोघेही एकमेकांशी बोलणं व भेटणं टाळायचे. बॉलीवूडमधील सुपरहिट ऑनस्क्रीन जोड्यांपैकी एक असलेले मल्लिका व इमरान आता अखेर २० वर्षांनी एका कार्यक्रमात भेटले. दोघांनी गळाभेट घेतली आणि एकत्र पोज दिल्या. मुंबईत चित्रपट निर्माते आनंद पंडित यांच्या मुलीच्या लग्नाच्या रिसेप्शनमध्ये हे दोघेही एकमेकांना बऱ्याच वर्षांनी भेटले. मल्लिका गुलाबी रंगाच्या ड्रेसमध्ये सुंदर दिसत होती, तर इमराननने काळ्या रंगाचा सूट घातला होता. मल्लिका पोज देत असताना इमरान तिथे आला, दोघेही एकमेकांशी बोलले, गळाभेट घेतली आणि नंतर त्यांनी पोज दिल्या. त्यांचा हा व्हिडीओ सोशल मीडियावर खूप चर्चेत आहे.



## मल्लिका काय म्हणाली होती...

२०२१ मध्ये मंदिरा बेदीला दिलेल्या मुलाखतीत मल्लिकाने इमरानसोबतच्या तिच्या भांडणाला बालिशपणा म्हटलं होतं. सर्वात मजेदार गोष्ट म्हणजे मर्डरनंतर इमरान व मी बोललो नाही आणि मला आता वाटतं की तो बालिशपणा होता. शूटिंग की प्रमोशन दरम्यान आमच्यात काहीतरी गैरसमज झाला होता. खरं तर तो आमचा दोघांचाही बालिशपणा होता, असं मल्लिका म्हणाली होती.

# सईला करायचंय रणवीर सिंहसोबत काम!



**'दुनियादारी', 'प्यारवाली लव्हस्टोरी' ते 'मिमी' आणि 'भक्षक'पर्यंतचा प्रवास करत सई ताम्हणकरने प्रेक्षकांचं मन जिंकलं. मराठी, हिंदी तसेच दाक्षिणात्य सिनेसृष्टीतही तिने आपल्या अभिनयाचा ठसा उमटवला आहे. लवकरच सई इमरान हाश्मी आणि 'स्कॅम १९९२' फेम प्रतीक गांधीबरोबर 'ग्राउंड झिरो' या चित्रपटात झळकणार आहे. याव्यतिरिक्त सईने रणवीर सिंहबरोबर काम करण्याची इच्छा व्यक्त केली आहे.**

एका मुलाखतीत जेव्हा सईला विचारण्यात आलं की, तुला कोणत्या अभिनेत्याबरोबर आणि दिग्दर्शकाबरोबर काम करण्याची इच्छा आहे. यावर सई म्हणाली, रणवीर सिंह, देव पटेल, श्रीराम राघवन, अनुराग कश्यप आणि नागराज मंजुळे. रणवीर सिंहच्या बहिणीची भूमिका मिळाली तर चालेल का? असं मुलाखतदाराने विचारताच सई ताम्हणकर नाही असं स्पष्टचं म्हणाली. मग वहिनीची भूमिका चालेलं का? असंही अभिनेत्रीला विचारण्यात आलं. यावर सई म्हणाली, बघा, भूमिका कशी आहे त्यावर अवलंबून आहे. वहिनी किंवा बहिणीची भूमिका असली तरी भूमिकेवर सगळं अवलंबून आहे. 'सौ. शशी देवधर' हा चित्रपट हिंदीमध्ये रिमेक व्हावा असंही सई या मुलाखतीदरम्यान म्हणाली. आयुष्यभर एकाच अभिनेत्याबरोबर काम करायचं असेल तर तो कोणता अभिनेता असेल? असा प्रश्न विचारताचं सईने ललित प्रभाकरचं नाव घेतलं. दरम्यान, सईच्या कामाबद्दल सांगायचं झालं तर सई शेवटची 'भक्षक' या चित्रपटात भूमी पेडणेकरबरोबर झळकली होती. हा चित्रपट नेटफ्लिक्सवर प्रदर्शित झाला. सई 'महाराष्ट्राची हास्यजत्रा' या विनोदी कार्यक्रमाची परीक्षक आहे. लवकरच सई 'ग्राउंड झिरो', 'अग्नी' या चित्रपटांद्वारे प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे.

# अमृता खानविलकरने सांगितला शूटिंगचा भयानक किस्सा

**'वाजले की बारा', 'चंद्रा' अशा गाण्यांचा उल्लेख जरी केला तरी अभिनेत्री अमृता खानविलकरचं नाव डोळ्यासमोर येतं. 'गोलमाल' चित्रपटातून तिने मराठी कलाविश्वात पदार्पण केलं. गेल्या काही वर्षांत अमृताने मराठीसह हिंदी कलाविश्वात तिची एक वेगळी ओळख निर्माण केली आहे. सध्या ती 'लुटेरे' या सीरिजमुळे प्रचंड चर्चेत आहे. अमृताने नुकत्याच 'मिड डे'ला दिलेल्या मुलाखतीत या सीरिजच्या शूटिंगदरम्यानचा अनुभव सांगितला.**

कोरोना काळात दक्षिण आफ्रिकेत लुटेरेचं शूटिंग सुरू होतं. अमृता सुद्धा खास शूटिंगसाठी संपूर्ण टीमबरोबर त्याठिकाणी रवाना झाली होती. याबद्दल अभिनेत्री सांगते, दक्षिण आफ्रिकेत आम्ही ज्या ठिकाणी शूटिंग करत होतो ती जागा म्हणजे पृथ्वीवरचा सर्वात मोठा स्लम एरिया होता. जसा धारावी परिसर आपल्या आशियात सर्वात मोठा आहे, अगदी तसाच दक्षिण आफ्रिकेतील तो भाग पृथ्वीवरची सर्वात मोठी झोपडपट्टी आहे. अमृता म्हणाली, त्या भागात साधी-साधी आफ्रिकन लोक सुद्धा बंदुका घेऊन फिरत होती. माझ्या शूटिंगच्या पहिल्या दिवशी मी व्हॅनमध्ये बसले होते आणि त्या गाडीचं दार मी उघडं ठेवलं. कारण, मला प्रचंड गरम होत होतं. तेवढ्यात सेटवरचा एक मुलगा पळत-पळत आला आणि



म्हणाला, मॅडम तुम्ही प्लीज सगळं बंद करून बसा... तुम्हाला इथून किडनॅप करुन घेऊन जातील आणि आम्ही काहीच करू शकणार नाही. आता हे सांगणं खूप सोपं आहे. पण, तेव्हा माझ्या मनात खरंच एक भीती निर्माण झाली होती. कोरोना काळादरम्यान आमचं शूटिंग सुरू होतं. त्यामुळे तिथेही आर्थिक चणचण वगैरे होती. अगदी अलीकडच्या काळात आफ्रिकेतील निर्बंध उठवण्यात आलेत. त्या भागात माफिया, गुन्हेगारी, बेरोजगारी मोठ्या प्रमाणात आहे. अशा ठिकाणी शूटिंग करण्याचा अनुभव काहीतरी वेगळाच होता. कारण, आपण भारतात खरंच खूप जास्त सुखी आहोत. आपल्याला जे पाहिजे ते आपण बोलू शकतो, आपल्याला हवं तिथे फिरू शकतो पण, त्या ठिकाणी एवढ्या सोयीसुविधा नव्हत्या, असं अमृता खानविलकरने सांगितलं.

# अक्षय कुमारचा फ्लॅट घेणारीने घेतली नवी गाडी

सध्या सोशल मीडियावर असंख्य क्रिएटर्स आहेत. पण काही कंटेंट क्रिएटर्सनी आपल्यातल्या वेगळ्या कौशल्याने नेटकऱ्यांसह सेलिब्रिटींची मनं जिंकली आहेत. त्यापैकी एक म्हणजे २४ वर्षांची कंटेंट क्रिएटर चांदनी भाभदा. सोशल मीडियावर ती खूप प्रसिद्ध आहे. चांदनी आलिया भट्टची हुबेहुब मिमिक्री करते. तिच्या या कौशल्याचे आलियाने देखील कौतुक केलं होतं. अशा या प्रसिद्ध कंटेंट क्रिएटर चांदनी भाभदाने काही महिन्यांपूर्वी अभिनेता अक्षय कुमारचा फ्लॅट खरेदी केला होता. त्यानंतर तिने आता आलिशान गाडी खरेदी केली आहे.

चांदनी भाभदाने काल, १० एप्रिलला सोशल मीडियावर नव्या गाडीसह फोटो, व्हिडीओ शेअर करून चाहत्यांना ही आनंदाची बातमी दिली आहे. पहिल्या फोटोत चांदनी नव्या गाडीसह पाहायला मिळत आहे. दुसऱ्या, तिसऱ्या आणि चौथ्या व्हिडीओमध्ये गाडीची पूजा-अर्चा करताना दिसत आहे. पाचव्या फोटोमध्ये चांदनी तिच्या स्वप्नवत गाडीत बसलेली पाहायला मिळत आहे. चांदनीच्या या पोस्टवर अनेक कलाकार मंडळींसह कंटेंट क्रिएटर्सने प्रतिक्रियेच्या माध्यमातून शुभेच्छा दिल्या आहेत. अभिनेत्री जरीन खान, मल्हार कलांबे, हर्ष राणे, सई गोडबोले अशा अनेकांनी चांदनीला शुभेच्छा दिल्या आहेत. दरम्यान, चांदनीच्या या नव्या गाडीची किंमत २० लाखांहून अधिक आहे. चांदनीचे इन्स्टाग्रामवर ४ लाख ७२ हजार फॉलोअर्स आहेत. तिने वकिलीचं शिक्षण घेतलं आहे. ती व्हीजे म्हणजे व्हिडीओ जॉकी आहे. पण ती पूर्णपणे वेळ कंटेंट क्रिएटरचं काम करते.

# संकर्षणशी लग्नाचा चाहती हट्ट धरते तेव्हा...

नाटक, मालिका, चित्रपटातून घराघरात पोहोचलेला अभिनेता संकर्षण कऱ्हाडे नेहमी चर्चेत असतो. संकर्षण त्याच्या कामामुळे जितका चर्चेत असतो, तितकाच तो त्याच्या सोशल मीडियावरील पोस्टमुळेही चर्चेत असतो. सध्या संकर्षण रंगभूमी गाजवताना दिसत आहे. 'तू म्हणशील तसं', 'नियम व अटी लागू' ही नाटकं आणि 'संकर्षण व्हाया स्पृहा' हा कार्यक्रम त्याचा रंगभूमीवर जोरदार सुरू आहे. प्रेक्षक संकर्षणच्या या कलाकृतींना उदंड प्रतिसाद देताना दिसत आहे. याचनिमित्ताने अभिनेत्याच्या चाहत्यांबरोबर भेटीगाठी होतं आहेत. याचे किस्से तो सोशल मीडियावर शेअर करत आहे. संकर्षण कऱ्हाडेने नुकतीच एक पोस्ट केली आहे. ज्यामधून त्याने एका चाहतीचा किस्सा सांगितला आहे. त्या चाहतीने केलेल्या मेसेजच्या स्क्रीनशॉट शेअर करत संकर्षणने लिहिलं आहे, काल साताऱ्यामध्ये प्रयोगानंतर एक मॅडम भेटल्या. त्यांच्याविषयी थोडं शेअर करतोय. वेळ असेल तर वाचा. त्यांनी म्हणे १२ वर्षांपूर्वी टेलिव्हिजनवरती माझं काम पाहिलं आणि घरी आईला सांगितलं की, मला संकर्षण बरोबरचं लग्नं करायचंय. त्यावर बारावीतल्या त्या पोरीला आई म्हणाली, 'अभ्यास करा...' पुढे त्यांचं शिक्षण झालं, लग्नं झालं, दीड वर्षांचा त्यांना मुलगा आहे आणि आता त्या सातारामध्ये असतात. काल प्रयोगाच्या निमित्ताने त्या आवर्जून मला भेटल्या. त्यांचा नवरा त्यांना स्वतः असं म्हणाला की, बाळ झोपलं असेल तर नक्की भेटून ये जा आणि आमची भेट झाली. त्यांनी मला हे सगळं स्वतः सांगितलं... दीड वर्षाच्या झोपलेल्या बाळाला घरी ठेऊन अगदी साध्या वेशात आलेली ती आई मला हे सगळं सांगून गेली. किती गोड आहे यार हे..." "प्रेक्षक आणि कलाकार यांच्या अनेक वर्षे एकत्र होणाऱ्या या प्रवासाचंही मला कौतुक वाटलं...त्यांना मला हे मनमोकळेपणाने सांगावं वाटलं या भावनांचंही मला फार फार कौतुक वाटलं आणि बाळ झोपलं असेल तर त्यांना भेटून ये, बोल, हे म्हणणाऱ्या त्यांच्या नवऱ्याच्या समजुतदारपणाचंही मला खूपच कौतुक वाटलं... माझ्या नावावरून त्यांनी त्यांच्या मुलाचं नाव पण विष्णूचं ठेवलंय हे तर काहीच्या काही मस्त वाटलं... प्रेक्षकहो.. असंच प्रेम करत राहा...भेटत राहा...मी जबाबदारीने काम करीन. (त्यांचं नाव, फोटो मुद्दाम टाकला नाही पण पोस्ट मात्र त्यांच्या परवानगीनेच करतोय), असं संकर्षणने लिहिलं आहे. दरम्यान, संकर्षण नाटका व्यतिरिक्त टेलिव्हिजनवरील अनेक कार्यक्रमांमध्ये सूत्रसंचालन करताना दिसतो. जेव्हा 'चला हवा येऊ द्या' कार्यक्रमातून डॉ. नीलेश साबळेंची एक्झिट झाली होती. तेव्हा सूत्रसंचालनाची जबाबदारी काही दिवसांसाठी संकर्षणकडे देण्यात आली होती.

## शॉर्ट न्यूज

### नामवंत मल्लांनी गाजवला कुस्तीचा आखाडा

**श्रीरामपूर :** येथील श्रीराम नवमीनिमित्त सुरू असलेल्या यात्रेची कुस्त्यांच्या जंगी हगाम्याने सांगता झाली. राज्यातील नामवंत पहिलवानांनी कुस्ती हगाम्यात हजेरी लावली. सुमारे २०० मल्लांनी हगाम्यात सहभाग नोंदवला. रामनवमी उत्सवाचे हे ९४ वे वर्ष होते. श्रीराम नवमी व सय्यदबाबांचा उरूस एकाच वेळी सुरू झाला. श्रीरामपूर नगरपालिकेचे प्रथम नगराध्यक्ष स्व. रामचंद्र महाराज उपाध्ये यांनी या उत्सवाची परंपरा सुरू केली. लहान-मोठ्या मल्लांनी चांगल्या प्रकारच्या चितपट कुस्त्या करून प्रेक्षकांच्या डोळ्याचे पारणे फेडले.

### स्पर्शराज आभाळे याचे मंथन परीक्षेत यश

**संगमनेर :** तालुक्यातील चिंचोलीगुरव येथील श्री छत्रपती शिवाजी विद्यालयातील इयत्ता पाचवीत शिकणारा विद्यार्थी स्पर्शराज सुहास आभाळे याने मंथन प्रज्ञाशोध परीक्षेत तळेगाव केंद्रात प्रथम क्रमांक मिळविला त्यांरे राज्यात त्याने ५५ वा क्रमांक मिळवित सुयश संपादन केले. चिंचोलीगुरव विद्यालयात आयोजित कार्यक्रमात या यशाबद्दल स्पर्शराज सुहास आभाळे याचा विद्यालयाचे मुख्याध्यापक आर. बी. अडांगळे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. प्रसंगी रामनाथ आभाळे, डॉ. सुहास आभाळे, विनोद गोडगे, दत्तात्रय ढवळे उपस्थित होते.

### पाथर्डी नगर परिषदेसमोर बेमुदत उपोषण

**पाथर्डी :** नगरपरिषदेमार्फत स्वच्छतेचा ठेका हा खाजगी कंपनीला देण्यात आला असून ह्या कंपनीचे ठेकेदाराने मनमानी करत गेली दहा वर्ष कंत्राटी पद्धतीने काम करणाऱ्या सफाई कामगारांना बाजूला करून नव्या कामगारांना घेण्यात आले आहे. त्यामुळे जुन्या सफाई कामगारांवर अन्याय केला आहे. अशा जुन्या कामगारांना कामावर घ्यावे, अन्यथा आता न्यायालयात याच्या विरोधात दाद मागणार असल्याचा इशारा यावेळी नगरपरिषद कर्मचारी महासंघ संघटनेच्या वतीने देण्यात आला आहे.

### कालव्यात पडलेल्या तरुणाचा मृतदेह सापडला

**शेवगाव :** पैठण उजव्या कालव्यात पडलेल्या तरुणाचा मृतदेह दुसऱ्या दिवशी सापडला. अण्णा लक्ष्मण गायकवाड (वय २२), रा. हातगाव, ता. शेवगाव, असे या तरुणाचे नाव आहे. याबाबत बोधेगाव पोलीस दूरक्षेत्राचे सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक नानासाहेब गर्जे यांनी कालव्यातून काढलेला मृतदेह शेवगावला उत्तरीय तपासणीसाठी पाठवला. त्या नंतर नातेवाईकांच्या ताब्यात देऊन मृतदेहाचा अंत्यविधी करण्यात आला आहे. पैठण उजवा कालव्यातून अंघोळ करण्यासाठी गेला असता, पाय घसरून कालव्यात पडला. त्याचा शोध घेऊनही तो सापडला नव्हता.

### कोपरगाव पालिकेची साडेचार कोटींची वसुली

**कोपरगाव :** वाढत्या विस्तारीकरणामुळे शहरात १७ हजार ४८० मालमत्ता असून त्यांच्याकडे येथील नगरपालिकेची ९ कोटी ३० लाख ७२ हजारांची घरपट्टी थकली असून पालिकेच्या यंत्रणेने त्यापैकी ४ कोटी ५९ लाख ८० हजारांची वसुली केल्याची माहिती मुख्याधिकारी सुहास जगताप यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली. याबाबत दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, वसुलीचे प्रमाण हे ४९. ४० टक्के आहे. तर १४ हजार ६९९ निवासी नळ धारकाकडे ५ कोटी ४४ लाख ५२ हजारांची नळपट्टी थकली असून त्यापैकी २ कोटी ५ लाख ३ हजार रूपये वसुल झाले आहेत.

# डॉ. तनपुरे कारखाना कामगारांचा खा.डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठिंबा

## जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांच्या उपस्थितीत मेळावा



**राहुरी : प्रतिनिधी**

**डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्यात आपण कधीच राजकारण केलेले नाही सर्व कामगारांच्या प्रश्नांची सोडवणूक करण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत असे आश्वासन जिल्हा सहकारी बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी दिल्याने सर्व कामगारांनी खा.डॉ. सुजय विखे पाटील यांना पाठिंबा जाहीर केला.**

राहुरी येथे डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखाना कामगारांचा मेळावा जिल्हा बँकेचे चेअरमन, माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांच्या उपस्थितीत पार पडला. यावेळी नगरसेवक विक्रम भुजाडी, साखर कामगार युनियनचे अध्यक्ष गजानन निमसे, उपाध्यक्ष अर्जुन दुशिंग, सचिव सचिन काळे, जिल्हा उपाध्यक्ष अमोल भनगडे, संचालक रविंद्र म्हसे, कामगार नेते कारभारी खुळे, सुरेश थोरात आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री तथा जिल्हा बँकेचे चेअरमन शिवाजीराव कर्डिले यांनी सांगितले की, आम्ही कधीही डॉ. तनपुरे सहकारी साखर कारखान्यात राजकारण केले नाही. जिल्हा बँकेच्या माध्यमातून नेहमी कारखान्याला मदत व सहकार्य करण्याचे काम केले. कै. रामदास पाटील धुमाळ यांच्या काळात देखील बँकेची मदत मिळवून दिली होती. संस्था टिकली पाहिजे, कामधेनू जगली पाहिजे, ऊस उत्पादक सभासद व कामगारांना न्याय मिळाला पाहिजे हीच भूमिका घेण्याचे काम केले. सभासदांनी निवडणुकीत निवडणूक दिलेल्या पॅनलला मदत करण्याचे आम्ही जाहीर केले होते त्यानुसार संचालक मंडळास मदत केली. कर्जाचे पुनर्गठन करून खा.डॉ.सुजय विखे पाटील यांनी पुढाकार घेऊन संचालक मंडळाच्या सहकार्याने कारखाना सुरू केला.


कारखाना बंद कसा पडला, सुरू कोणी केला याचा विचार सर्वांनी केला पाहिजे. काही दिवसांपूर्वी कामगारांनी पत्रकार परिषदेत आपल्या प्रश्नासाठी भूमिका घेतली यामध्ये खा.डॉ. सुजय विखे पाटील व आम्हाला काही चूक वाटत नाही. चार वेळा बँकेच्या माध्यमातून निविदा प्रक्रिया राबविण्याचे काम झाले. परंतु यामध्ये कामगारांना दुर्लक्षित करून चालणार नाही अशी अट घातली होती. त्यामुळे कोणी पुढे आले नाही. मागील वेळी कामगारांनी आंदोलन केले त्यावेळी सुमारे ८.५० कोटी रुपये फंडाची रक्कम आपण बँकेच्या टॅगिंग मधून मिळवून देण्याचे काम केले. यापुढे देखील कारखाना सुरू करण्यासाठी पूर्ण सहकार्य राहील. तसेच कामगारांचे देणे देण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत अशी भूमिका मांडताच उपस्थित सर्व कामगारांनी खा.डॉ. सुजय विखे पाटील व माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांना पाठिंबा जाहीर केला.

प्रास्तविक करताना युनियनचे सचिव सचिन काळे यांनी सांगितले की, कारखान्याचे कामगार कारखाना गेटच्या आतमध्ये कोणतेही राजकारण करत नाही. मागील निवडणुकीत आम्ही सर्व कामगारांनी एकमताने खा.डॉ. सुजय विखे पाटील यांचा गावोगावी जाऊन प्रचार केला होता. आम्हाला राजकारण करायचे नाही आमची रोजी रोटी महत्वाची आहे. त्यामुळे आमच्या हक्काचे देणे मिळाले पाहिजे आम्ही सर्व कामगार यावेळी देखील खा. डॉ. सुजय विखे यांना निवडणूक आणण्यासाठी प्रयत्न करणार आहोत.

युनियनचे उपाध्यक्ष अर्जुन दुशिंग यांनी सांगितले की, डॉ. तनपुरे कारखाना कामगारांचा प्रश्न महत्वाचा आहे. खा.डॉ.सुजय विखे पाटील व शिवाजीराव कर्डिले यांच्याकडून नेहमीच आमच्या अपेक्षा पूर्ण झाल्या आहेत. कामगारांनी मागील वेळी आंदोलन केले त्यावेळी शिवाजीराव कर्डिले यांनी केलेल्या यशस्वी मध्यस्थीने आम्हाला फंडाचे पैसे मिळू शकले. आता देखील प्रलंबित प्रश्न मार्गी लावून कारखाना चालवावा आम्ही सोबत असून आम्ही सर्व कामगार खा.डॉ. सुजय विखे पाटील व माजी मंत्री शिवाजीराव कर्डिले यांना जाहीर पाठिंबा देतो असे सांगितले. कारभारी खुळे यांनी सांगितले की, सेवा निवृत्त कामगारांचे देणे अद्याप मिळालेले नाही यासाठी प्रयत्न करावा. सर्व कामगार लोकसभा व विधानसभा निवडणुकीत आपल्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील असे सांगितले. यावेळी बहुसंख्य कामगार मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तापमानाचा पारा वाढला

## प्रशासनासमोर मतदानाच्या टक्केवारीची चिंता



**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीसाठी दुसऱ्या टप्प्यातील मतदान प्रक्रिया सुरू आहे. नगर व शिर्डी लोकसभा मतदारसंघासाठी १३ मे रोजी मतदान होणार आहे. एप्रिल महिन्यातच तापमानाचा पारा ४० अंश जवळ गेल्याने १३ मे च्या आसपासही तापमान असेच राहण्याची शक्यता आहे. त्यामुळे जास्तीत-जास्त मतदान घडवून आणण्याचे प्रशासनासमोर आव्हान असणार आहे.**

आत्तापर्यंत उन्हाळ्यात झालेल्या निवडणुकांमध्ये मतदानाची टक्केवारी ६० टक्क्यांच्या आतच असल्याची दिसते आहे. पहिल्या टप्प्यात झालेल्या मतदानच्या आकडेवारीनुसार मतदानाच्या टक्केवारीवर परिणाम झाल्याचे दिसून येत आहे. १३ मे रोजी नगर आणि शिर्डी लोकसभा मतदारसंघात मतदान आहे. वैशाख महिना म्हणजे तापमानाच्या दृष्टीने कडक असतो. तापमान चाळीशी पार असेल, तर त्याचा किती परिणाम होतो की नाही, हे पाहावे लागणार आहे.

दरम्यान, उन्हाचा पारा वाढल्याने लोक दुपारी १२ ते ४ घराबाहेर न पडणे पसंत करतात. त्यामुळे ऐन उन्हाळ्यात मतदानाची प्रक्रिया पार पडणार असल्याने प्रशासनाने प्रत्येक बुथवर नागरिकांसाठी पाणी, कुलर, दिव्यागांसाठी व्हीलचेअर आदी सुविधा उपलब्ध केल्या आहे. तरी जास्तीत-जास्त नागरिकांनी मतदान करावे, असे आवाहन प्रशासनाकडून करण्यात आले आहे.

# प्रत्येक मतदान केंद्रावर एक प्राथमिक उपचार पेटी

## कडाक्याच्या उन्हामुळे प्रशासन सतर्क



**नगर : प्रतिनिधी**

**लोकसभा निवडणुकीचा बिगुल वाजला आहे. उन्हाच्या कडाक्यात नगर, शिर्डी लोकसभेची मतदान प्रक्रिया पार पडणार आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासन सतर्क झाले आहे. आरोग्य विभागासह आशा वर्कर्स, अंगणवाडी सेविका यांना दक्ष राहण्याच्या सूचना देण्यात आल्या आहे. जिल्ह्यात एकूण ३ हजार ७३४ मतदान केंद्र असून प्रत्येक मतदान केंद्रावर जिल्हा आरोग्यविभागाकडून प्राथमिक उपचार पेटी दिली जाणार आहे.**

जिल्ह्यात एकूण शंभर जिल्हा प्राथमिक आरोग्य केंद्र आहेत. तर २५ ग्रामीण रुग्णालय आहेत. या रुग्णालयातील कर्मचाऱ्यांचे पथक तयार केले जाणार आहे. रुग्णवाहिकेत एक डॉक्टर व नर्स अशी टीम असणार आहे. उन्हाचा पारा ४० अंशच्या पुढे जाण्याची शक्यता आहे, अशावेळी नागरिक दुपारी १२ ते सायंकाळी ५ वाजेच्या दरम्यान घराबाहेर जाणे टाळतात. याचा परिणाम मतदानाच्या टक्केवारी देखील होतो. या दृष्टीने आरोग्य यंत्रणेला मतदानाच्या दिवशी तत्पर सेवा पुरवण्यासाठी सतर्क राहण्याच्या सूचना दिल्या आहेत.

# भावा, तुझ्या पराभवाचा बदला घेणार! पार्थसाठी रोहित पवारांची बॅटिंग



**पुणे : प्रतिनिधी**

**गेल्या पाच वर्षांत राज्यात घडलेल्या अभूतपूर्व घडामोडींमुळे, दोन मोठ्या प्रादेशिक पक्षांमध्ये फूट पडल्यानंतर पहिल्यांदाच निवडणूक होत असल्याने प्रचारात रंगत आली आहे. आपल्या भूमिका मतदारराजाला पटवून देताना नेत्यांची, उमेदवारांची दमछाक होताना दिसत आहे. गेल्या निवडणुकीत आमनेसामने उभे ठाकलेले पक्ष आता विरोधात उभे आहेत. गेल्या निवडणुकीत सोबत प्रचार केलेले नेते आता एकमेकांवर टीकेचे बाण सोडत आहेत. तर काही ठिकाणी नेमकी उलट परिस्थिती आहे.**

महायुतीचे उमेदवार आणि शिंदेसेनेचे खासदार श्रीरंग बारणेंनी त्यांचा उमेदवारी अर्ज दाखल केला. सेनेच्या तिकिटावर लढलेल्या बारणेंनी गेल्या निवडणुकीत राष्ट्रवादीच्या पार्थ पवारांचा दारुण पराभव केला. हा पराभव पार्थ यांचे वडील अजित पवारांच्या जिव्हारी लागला. आता अजित पवार महायुतीत उपमुख्यमंत्री आहेत. गेल्या निवडणुकीत ज्या बारणेंचा विरोध केला, त्यांच्या प्रचारात आता अजित पवार दिसू लागले आहेत. यावरुन आमदार रोहित पवारांनी त्यांच्यावर शरसंधान साधलं आहे.

आम्ही विचार सोडलेले नाहीत. त्यामुळे आम्ही कालही बारणेंविरोधात लढलो आणि आजही लढतोय, असे म्हणत रोहित पवारांनी अजित पवारांना लक्ष्य केलं. मागील निवडणुकीत मावळमध्ये मी पार्थसाठी प्रचार केला. पण दुर्दैवानं त्यांचा मोठा पराभव झाला.









# गुंड प्रविण रसाळचा जामीन फेटाळला

## औरंगाबाद खंडपीठाचा पुन्हा दणका

**औरंगाबाद : प्रतिनिधी**

**सुनिल रघुनाथ पवार यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करणाऱ्या प्रविण रसाळ या कुख्यात गुंडाचा जामीन अर्ज उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने फेटाळला आहे.**



याबाबतची माहिती अशी आहे की कुख्यात गुंड प्रविण रसाळ व त्याच्या दहा ते बारा साथीदारांनी ४ जुलै २०१४ रोजी सुनिल रघुनाथ पवार यांना जिवे मारण्याचा प्रयत्न करुन जिवघेणा हल्ला केला होता. या गुन्ह्यात रसाळ व त्याच्या साथीदारांना अटक झाली होती. त्यानंतर २०१६ मध्ये वैद्यकीय कारणासाठी रसाळ यास जामीन मंजूर झाला होता. रसाळ याने जामीनावर सुटल्यावर पवार हल्ल्याप्रकरणातील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार असलेले माजी सरपंच व बाजार समितीचे माजी उपसभापती संदीप पाटील वराळ यांची साथीदारांच्या सहाय्याने निर्घुण हत्या केली. त्यानुसार रसाळ याच्यावर ३०२ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता. त्यानुसार अहमदनगर न्यायालयाने २०१८ रोजी रसाळ याचा जामीन रद्द केला होता. त्यानंतर रसाळ याने अहमदनगर जिल्हा न्यायालय,औरंगाबाद उच्च न्यायालय व दिल्ली सर्वो च्च न्यायालयात वारंवार जामीन मिळण्यासाठी अर्ज दाखल केला होता परंतु त्याला न्यायालयाने जामीन दिला नाही.

तद्नंतर आरोपी रसाळ याने नुकताच औरंगाबाद उच्च न्यायालयात २०१८ साली अहमदनगर जिल्हा न्यायालयाने रद्द केलेल्या आदेशाला आव्हान देऊन पुन्हा नियमित जामीन देण्यात यावा अशी आव्हान याचिका दाखल केली होती. फिर्यादीतर्फे ज्येष्ठ वकील नारायण नरवडे यांनी बाजू मांडताना न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले की सदरील आरोपीने वैद्यकीय कारणासाठी जामीन मिळाल्यावर केस मधील प्रत्यक्षदर्शी साक्षीदार संदिप वराळ यांची साथीदारांच्या मदतीने हत्या घडवून आणली आहे.या आरोपीस पुन्हा जामीन दिल्यास इतर साक्षीदारांच्या जीवितास देखील धोका होऊ शकतो. व आरोपी हा सराईत गुन्हेगार असून त्याच्या विरुध्द विविध पोलिस स्टेशनमध्ये गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल असून प्रकरण न्यायप्रविष्ट आहेत.म्हणून आरोपीस जामीन देण्यात येऊ नये.

फिर्यादीच्या वकिलांचे म्हणणे ऐकल्यानंतर औरंगाबाद उच्च न्यायालयाचे न्यायाधीश श्री.एन.बी. सुर्यवंशी यांनी रसाळ याचा जामीन फेटाळला. सदर प्रकरणात मूळ फिर्यादी गौरव रघुनाथ पवार यांच्यावतीने ॲड.नारायण नरवडे यांनी कामकाज पाहिले.

# मळगंगा देवीच्या ८५ फुट काठीची उत्साहात मिरवणूक

## मिरवणूकीसाठी भाविकांची मोठी गर्दी

**निघोज : प्रतिनिधी**

**मळगंगा देवीचा मुख्य यात्रा उत्सव दि.१ मे पासून सुरू होत असला तरी देवीला हळद लावणे तसेच ८५ फूट काठीची मिरवणूक हे उत्सव मोठ्या उत्साहात संपन्न झाले आहेत. सोमवार दि.२२ रोजी देवीला हळद लावण्याचा कार्यक्रम मोठ्या भक्तिभावाने संपन्न झाला असून मंगळवार दि.२३ रोजी देवीच्या काठीची मिरवणूक मोठ्या भक्तिभावाने संपन्न करण्यात आली.**



सजवलेली ही काठी ८५ फूट उंचीची असल्याने मोठ्या शिताफीने ही मिरवणूक मळगंगा देवीची हेमांडपंथी बारव या ठिकाणी साधारण पाच वाजता सजवली जाते. त्यानंतर मळगंगा देवीच्या जयजयकार करीत ही काठीची मिरवणूक ग्रामपंचायत चौक ते मळगंगा मंदिर अशाप्रकारे वाजत गाजत आणली जाते. यावेळी हजारो भाविक या काठीला उचलण्याचा आनंद घेत मळगंगा देवीच्या जयघोषाने आसमंत दणाणून गेला होता . देवीचा जयजयकार तसेच देवीची आराधना करीत हजारो भाविक तसेच ग्रामस्थ या मिरवणुकीत सामील होत असतात यावेळी भंडाऱ्याची उधळण मोठ्या प्रमाणात केली जाते.

देवीच्या मंदिराच्या शिखराला काठी लागल्यानंतर अकरा दिवस हा यात्रेचा उत्सव सुरू असतो यामध्ये शेतीच्या कामांना पुर्णपणे विश्रांती दिली जाते. ही पुर्वपरंपरा आजही जतन करण्यात येते. अकरा दिवस पशुहत्या बंद केली जाते या अकरा दिवसात घरोघर सवाष्णीचा कार्यक्रम संपन्न होत असतो तसेच गावोगावचे निघोज येथे येणारे महिला भाविक यात्रा उत्सवासाठी या ठिकाणी सवाष्णी कार्यक्रम मोठ्या उत्साहात संपन्न करतात या निमित्ताने देवीला पुरण पोळीचा नैवेद्य दाखवला जातो तसेच आसपासच्या महिलांना सवाष्णी साठी बोलवतात तसेच त्यांचा मानसन्मान,हळदी कुंकू लावीत त्यांनाही पुरण पोळीचा महाप्रसाद दिला जातो शेकडो वर्षांपासून सुरू असलेली ही धार्मिक परंपरा मोठ्या भक्तिभावाने आजही सुरू आहे.

# कु. गौरी चौरे झाली गोरेगावची पहिली महिला डॉक्टर!

## आई-वडिलांची स्वप्नपूर्ती करून शेतकऱ्याच्या मुलीने मिळवले यश




**गोरेगाव : संतोष तांबे**

**पारनेर तालुक्यातील गोरेगाव येथील ह.भ.प. जबाजी चौरे गुरुजी यांची नात व सौ. सुरेखा, सुनील जबाजी चौरे यांची मुलगी कु. गौरी हिने गावातील पहिली महिला होमिओपॅथी डॉक्टर होण्याचा मान मिळवला आहे. अहमदनगर होमिओपॅथिक शिक्षण संस्थेचे अध्यक्ष डॉ. भूषण अनभुले यांच्या शुभहस्ते झालेल्या भव्य दिव्य समारंभात पदवी प्रदान करण्यात आली.**

यावेळी संस्थेचे सचिव डॉ. दिलीप पवार, प्राचार्य डॉ. सुनील पवार, डॉ. रफि अहमद चौधरी, डॉ. साजिद सय्यद, शिक्षक व कर्मचारी प्रमुख उपस्थितीत होते. तिच्या या यशाबद्दल परिसरातुन कौतुक होत असुन, सर्वसामान्य शेतकरी कुटुंबातील मुलगी डॉक्टर झालेचा अभिमान तिच्या कुटुंबीयांना झाला आहे. गौरीची घरची परिस्थिती जेमतेम आई-वडिलांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करण्यासाठी तिच्या पंखाला बळ दिले. काही दिवस तिच्या शिक्षणासाठी गाव सोडून नगर येथे खाणावळ (मेस) चालून तिच्या शिक्षणाचा खर्च भागवला. गौरीनेही तिचे कॉलेज आणि तिचा अभ्यास सांभाळून आईला मेस मध्ये मदत केली.

गौरीचे दहावीपर्यंतचे शिक्षण गोरेश्वर माध्यमिक विद्यालय गोरेगाव येथे झाले. लहानपणापासून डॉक्टर होण्याचे स्वप्न पाहिले असल्यामुळे ११ वी पासून नगर येथे पुढील शिक्षणासाठी स्थायिक झाले. ११ वी, १२ वीचे कॉलेज करत करत घरात मेस ला मदत करून रात्री जागून निटचा अभ्यास केला. परिस्थिती सर्वसाधारण असल्यामुळे क्लास लावू शकले नाही. तरीही स्वतःच्या जिद्दीच्या जोरावर कष्ट करून डॉक्टरकिला नंबर लागला. गौरीचा बीएचएमएसला अहमदनगर होमिओपॅथिक मेडिकल कॉलेजला नंबर लागला. होमिओपॅथिक औषधांचे साईड इफेक्ट नाहीत व आजार मुळापासून नष्ट होतो म्हणून त्या फिल्डमध्ये करीअर करायचे होते असे तिने सांगितले. तेथे साडेचार वर्षे कॉलेज केले व १८ महिणे इंटरशिप करून शेवटी दिनांक २१ एप्रिल २०२४ रोजी गौरीला पदवी प्रदान करण्यात आली.जिल्हा परिषदेचे बांधकाम व कृषी समिती सभापती काशिनाथ दाते,खासदार डॉ. सुजय दादा विखे पाटील यांनीही गौरीने मिळवलेले याच्याबद्दल तिचे अभिनंदन केले आहे.

### आईचे स्वप्न पुर्ण झाले

**मी डॉक्टर व्हावे ही माझ्या आईचे स्वप्न होते. ते पूर्ण व्हावी यासाठी मी मेहनत घेतली. मला डॉक्टर झाल्याची पदवी मिळताना सर्वात जास्त आनंद माझ्या आई-वडिलांना झाला. मी ग्रामीण भागातील मुलींना हेच सांगू इच्छिते मेहनत करा यश मिळते. मला लहानपणापासून समाजसेवेची आवड आहे**


**डॉ. गौरी चौरे**
**बी.एच.एम.एस.**

# पारनेर तालुक्यात गुरूदेव शाळा अव्वल

## लक्षवेध परीक्षेत १७ विद्यार्थी राज्यात झळकले

**सुपा : प्रतिनिधी**

**लक्षवेध फाउंडेशन संचलित लक्षवेध या राज्यस्तरीय स्पर्धा परीक्षेची नुकतीच गुणवत्ता यादी प्रसिद्ध झाली असून यामध्ये पारनेर तालुक्यातील सुपा एमआयडीसी नजीकच्या गुरुदेव प्रशालेच्या तब्बल १७ विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादीत स्थान पटकावले आहे. याबद्दल सर्व विद्यार्थ्यांचे व शाळेचे सर्वत्र कौतुक होत आहे.**





गुरुदेव प्रशालेतील इयत्ता पहिलीतील तब्बल १६ व दुसरीतील एक असे एकूण १७ विद्यार्थ्यांनी यामध्ये घवघवीत यश मिळवले. अहमदनगर, पुणे ,बीड,नाशिक , जळगाव या जिल्ह्यात ही स्पर्धा परीक्षा झाली होती.

इयत्ता पहिलीच्या काव्यांजली भोर व समर्थ थिटे या दोघांनी शंभर पैकी ९६ गुण मिळवून राज्यात तिसरा येण्याचा मान मिळवला. त्यामुळे नुकतेच शाळेत पहिलं पाऊल टाकणाऱ्या या दोन्ही इयत्ता पहिलीच्या मुलांचे सर्वत्र खूप कौतुक होत आहे.

गुरुदेव मधील विद्यार्थी स्पर्धा परीक्षेत यश मिळवण्यासाठी वर्षभर मेहनत घेत असतात व निकालाची वाट पाहत असतात. स्पर्धा परीक्षा का द्यायची? त्यामध्ये कसे करिअर आहे याचे बाळकडू गुरुदेव मध्ये बालवयातच पाजले जाते.

त्यामुळे यावर्षी मंथन मध्ये ४० विद्यार्थी, लक्षवेध मध्ये १७ विद्यार्थी व आय एम विनर मध्ये ९ विद्यार्थी ओलंपियाड स्पर्धेत ७ विद्यार्थी अशा एकूण ७३ विद्यार्थ्यांनी केंद्र, जिल्हा व राज्यस्तरावर गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे.

संस्थेचे अध्यक्ष श्री संतोष मगर व मार्गदर्शक शिक्षक यांनी यासाठी नियोजनबद्ध तयारी करून घेतली होती. यश म्हणजे रोज केलेल्या प्रयत्नांची बेरीज असते. हे अल्पावधीतच नावारूपास आलेल्या गुरुदेव शिक्षण संस्थेने दाखवून दिले आहे.

यशस्वी विद्यार्थी त्यांचे गुण व राज्यातील पटकावलेले स्थान पुढीलप्रमाणे- गुण १०० पैकी काव्यांजली भोर - ९६ राज्यात तिसरी, समर्थ थिटे- ९६ राज्यात तिसरा, अंश जाधव -९४ राज्यात चौथा,आराध्या शिंगोटे- ९४ राज्यात चौथी, अर्णव पवार- ९४ राज्यात चौथा, कार्तिक येणारे - ९४ राज्याचा चौथा, आरव शिंदे- ९२ राज्यात पाचवा, दामिनी बेलेकर -९२ राज्यात पाचवी ,निखिल गाडीलकर -९२ राज्यात पाचवा, संपदा पठारे- ९२ राज्यात पाचवी, वेदांग मगर - ९२ राज्यात पाचवा, वेदिका येणारे -९२ राज्यात पाचवी, अनुष्का मगर -९० राज्यात सहावी, साजरी तरटे- ९० राज्यात सहावी, शिवराज चितळकर -९० राज्यात सहावा, स्वराज मगर -८८ राज्यात सातवा व इयत्ता दुसरी मधून भूमी शेळके- ८८ राज्यात सहावी.

सर्व यशस्वी विद्यार्थी, मार्गदर्शक शिक्षिका प्रियंकाताई, मनिषाताई, अर्चनाताई, सोनालीताई, प्रज्ञाताई, अश्विनी ताई, अंकिता ताई व रुख्मिनी ताई यांचे या यशाबद्दल सर्वत्र अभिनंदन होत आहे.

# रामभक्त हनुमान यांचा रामभक्तीचा जगाला अनोखा संदेश

## शिवाजी महाराज बोऱ्हाडे यांचे प्रतिपादन

**निघोज : प्रतिनिधी**

**प्रभू श्रीराम यांची भक्ती करीत भक्त हनुमान यांनी जगाला श्रेष्ठ भक्तीचा संदेश दिला असून अयोध्या येथे रामजन्म झाला म्हणून अयोध्या मंदिरात फक्त रामलल्ला यांची मुर्ती असल्याचे प्रतिपादन करीत शिवाजी महाराज बोऱ्हाडे यांनी उपस्थित भाविकांना मार्गदर्शन केले.**



पारनेर तालुक्यातील निघोज येथील ग्रामस्थ व पवनपुत्र हनुमान मंडळ यांनी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला. हनुमान जयंतीच्या पूर्वसंध्येला मारुती मंदिराजवळ कोमल संगीत रजनीचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी भक्तीगीतांनी या कार्यक्रमात रंगत आणली. मंगळवार दि.२३ रोजी पहाटे अभिषेक करण्यात आला त्यानंतर किर्तन, महाआरती तसेच किर्तनकार बोऱ्हाडे महाराज यांचा सत्कार करण्यात आला.

कै. सुमनबाई निवृत्ती उनवणे यांच्या स्मरणार्थ उनवणे परिवार व संतोष दुतारे यांच्या वतीने महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मंदिरावर आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. तसेच हनुमान मुर्तीभोवती आकर्षक असे स्टील तसेच काचेचे मोठ्या किंमतीचा गाभारा डी.बी.लाळगे कंट्रक्शनने तयार केला. त्याबद्दल पवनपुत्र हनुमान मंडळाच्या वतीने डी.बी.लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांचा सत्कार करण्यात आला.

मंगळवार दि.२३ रोजी पहाटे पाच पासूनच दर्शनासाठी भाविकांनी गर्दी केली होती. गेली अनेक वर्षांपासून पवनपुत्र हनुमान मंडळ व ग्रामस्थ यांच्या माध्यमातून या ठिकाणी हनुमान जन्मोत्सव मोठ्या उत्साहात साजरा केला जातो विशेष करुन नवी पेठेतील व्यापारी असोसिएशनच्या सदस्यांनी एकत्र येऊन हे मंडळ निर्माण केले असून गावकरी सुद्धा लोकसहभागातून यासाठी मदत करीत असल्याने जन्मोत्सव लक्षवेधी होत आहे.

# मारुती मंदिराच्या गाभाऱ्यासाठी डी.बी.लाळगे कन्ट्रक्शनचे योगदान

**निघोज : प्रतिनिधी**

**निघोज येथील मारुती मंदिरातील उत्कृष्ठ स्टील आणि काचेच्या माध्यमातून तयार केलेल्या गाभाऱ्यासाठी डी.बी. लाळगे कन्ट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांनी मोठे योगदान दिले असून यासाठी डी.बी.लाळगे कन्ट्रक्शनने १ लाख ९२ हजार रुपये खर्च केला आहे.**



याबद्दल पवनपुत्र हनुमान मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्र उनवणे, पदाधिकारी लहू गागरे, नाभिक समाजाचे शहर उपाध्यक्ष नाना राउत , महादेव उचाळे, मंगेश काळे यांनी पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच ग्रामस्थ यांच्या वतीने मळगंगा कन्ट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे यांचा सत्कार केला आहे. लाळगे हे मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्टचे विश्वस्त असून निघोज व परिसरातील विविध संस्थांच्या माध्यमातून ते कार्यरत आहेत.

डी.बी.लाळगे कन्ट्रक्शन कंपनी अंतर्गत ते कार्यरत असून लोकाभिमुख विकासासाठी कार्य करीत असलेल्या विविध विकास कामांमध्ये त्यांचे योगदान मोठे आहे. पवनपुत्र हनुमान मंडळाची स्थापना गेली पंधरा वर्षांपूर्वी येथील नवी पेठेतील व्यापारी व व्यावसायिक बंधूंनी केली तेव्हापासून या मंदिराची सकाळ, संध्याकाळी पुजा विधी तसेच अभिषेक व आरती करण्यासाठी परिसरातील ग्रामस्थ या मंडळाच्या माध्यमातून प्रयत्नशील असतात. या मंदिराचे नुतनीकरण करण्यासाठी पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट तसेच ग्रामस्थांनी लोकसहभागातून मोठी मदत केली आहे.

या मारुती मंदिरातील मारुतीच्या भोवतीचा लोखंडी गाभारा अत्यंत जुना झाल्याने खराब झाला होता. डी.बी.लाळगे कन्ट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, संचालक सागरशेठ लाळगे यांनी एक दिवस याची पाहणी केली तसेच पवनपुत्र हनुमान मंडळाचे ज्येष्ठ मार्गदर्शक राजेंद्र उनवणे व त्यांच्या सहकाऱ्यांशी चर्चा केली व कशाप्रकारे गाभारा अपेक्षित आहे याची माहिती घेतली त्याप्रमाणे लाळगे यांनी शिरुर व पुणे येथील नामांकित कारागीरांशी चर्चा करून अतिशय सुसज्ज तसेच स्टिल व काच यांचा गाभारा तयार करून घेतला. व नुकताच हा गाभारा श्रीराम भक्त हनुमान यांच्या चरणी अर्पण केला.

याबद्दल निघोज ग्रामस्थ, मुंबईकर मंडळ, मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट, पवनपुत्र हनुमान मंडळ तसेच पारनेर तालुका पत्रकार संघ मराठी पत्रकार संघ यांनी डी बी लाळगे कंट्रक्शनचे अध्यक्ष दत्तात्रय लाळगे, संचालक सागरशेठ रसाळ व त्यांच्या कुटुंबीयांचे कौतुक करीत धन्यवाद व्यक्त केले आहे.

**धार्मिक संस्कृती वाढविण्यासाठी आपण सदासर्वदा प्रयत्नशील असून मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट माध्यमातून आपण विश्वस्त म्हणून भूमिका यथायोग्य पार पाडीत असून सामाजिक, धार्मिक,शैक्षणिक कार्यात आपल्याला काम करण्याचा आनंद मिळत असून ती एक प्रेरणा आहे. गेली पन्नास ते साठ वर्षांच्या कार्यकाळात या गाव व परिसरातील ज्येष्ठ मंडळींनी मंदीर बांधकाम करीत जी धार्मिक संस्कृती जतन करण्यासाठी प्रयत्न केले त्यांचे अनुकरण करणे ही मळगंगा मातेची खऱ्या अर्थाने सेवा आहे. माता मळगंगा देवी हे राज्यातील जागृत देवस्थान असून मातेमुळे गावाला आर्थिक समृद्धी व समाजसेवेचे पाठबळ मिळाले असून माता मळगंगा देवीच्या आशीर्वादाने सर्व काही मिळत आहे.**

**दत्तात्रय लाळगे**
**विश्वस्त मळगंगा ग्रामीण विकास ट्रस्ट**

# खडकवाडीच्या एसएनए जुकेअर शाळेचे ५ विद्यार्थी गुणवत्तायादीत

## आरोही दिघेचा राज्यात २३ वा क्रमांक

**खडकवाडी : प्रतिनिधी**

**मंथन प्रज्ञाशोध परीक्षा २०२४ चा निकाल नुकताच जाहीर झाला असून एस.एन. एजुकेअर् इंटरनॅशनल स्कूल, खडकवाडी शाळेतील पाच विद्यार्थ्यांनी राज्य गुणवत्ता यादी मध्ये स्थान मिळवले आहे.**




इयत्ता पहिलीतील विद्यार्थिनी आरोही किरण दिघे राज्य गुणवत्ता यादीत २३ वा क्रमांक मिळवला आहे. सुजय विदेश पोळ याने २६ वा क्रमांक मिळवला आहे. इयत्ता २ री तील संदेश योगेश गोळे याने राज्य गुणवत्ता यादीत २५ वा क्रमांक मिळवला आहे. प्रांजल मयूर जाधव हिने पारनेर तालुक्यात ८ वा क्रमांक तसेच काव्या महेंद्र काशीद हिने १२ वा क्रमांक मिळवला आहे. या विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणाऱ्या राणी गागरे, पूजा गागरे, ऋतुजा गायकवाड,रुपाली हरदे व प्रियंका गागरे या सर्व शिक्षकांचे प्राचार्या शुभांगी ढोकळे व संस्थेचे अध्यक्ष नितीन ढोकळे यांनी आभार मानले.

# निर्वीच्या सोनवणे विद्यालयात १९ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती !

## शिवाजी विधाते व ऐश्वर्या डोंगरे या शिक्षकांवर अभिनंदनाचा वर्षाव

**शिरूर : प्रतिनिधी**

**म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित तात्यासाहेब खंडेराव सोनवणे विद्यालय निर्वी या माध्यमिक विद्यालयाने एन एम एम एस परीक्षेत उत्तुंग यश संपादन केले असून १९ विद्यार्थ्यांना राष्ट्रीय आर्थिक दुर्बल शिष्यवृत्ती मिळाली असल्याची माहिती मुख्याध्यापक विष्णू करपे यांनी दिली. या विद्यार्थ्यांना शिवाजी विधाते व ऐश्वर्या डोंगरे या शिक्षकांनी मार्गदर्शन केले.**



म्हसोबा शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष मा. आमदार सूर्यकांत काका पलांडे व मा. आदर्श सरपंच तात्यासाहेब सोनवणे यांनी तसेच निर्वी ग्रामस्थांनी या विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले. शिष्यवृत्ती मिळालेल्या विद्यार्थ्यांना वर्षाला ९६०० अशी ४ वर्षे शिष्यवृत्ती मिळणार आहे. अंकिता काटे ८३, तनुजा सोनू १०१, गौरी पडवळ १०१, श्रेया पवार ९४, अदिती सोनवणे ९४, पायल गायकवाड ७७, दरेकर तन्वी १०३, धामोरे समीक्षा ११०, शितोळे समीक्षा ९२, लगड प्रतिक्षा ८३, काटे उत्कर्ष ७६, जगताप गौरी ९५, सोनवणे ईश्वरी ९०, पवार गायत्री ९५, पवार श्रावणी ९५, बोरकर साक्षी १०६ बोरकर शर्विल ८९, ताकवणे संदीप ७५, राज कदम ७६ अशा १९ विद्यार्थ्यांनी ही शिष्यवृत्ती प्राप्त केली आहे.

'पारनेर दर्शन' हे पत्रक मुद्रक,प्रकाशक व मालक देविदास रामभाऊ आबूज यांनी ओंकार ऑफसेट, कॉलेज रोड, पारनेर ४१४३०२ अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून 'पारनेर दर्शन' कार्यालय, कॉलेज रोड,पारनेर ४१४३०२,जि.अहमदनगर (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. संपादक : देविदास रामभाऊ आबूज मोबा.९४२१४७८२८३ ई- मेल : deviabuj@gmail.com
'PARNER DARSHAN' Printer,Publisher And Ower By DEVIDAS RAMBHAU ABUJ Printed At OMKAR OFSSET Collage Road,PARNER-414302 Dist-Ahmednagar (M.S)
Editor-DEVIDAS RAMBHAU ABUJ ▪ Mob : 9421478283 ▪ Email : deviabuj@gmail.com